# माहितीचा अधिकार

माहिती अधिकार अधिनियम 2005 अंतर्गत सन 2024 मध्ये प्राप्त झालेल्या अर्जाचा तपशील

| अ.क्र | प्राप्त अर्ज | निकाली अर्ज | प्रलंबित अर्ज | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | ३ | ३ | ० | |

## अधिकारी/कर्मचारी यांचा वेतनाचा तपशिल

| **जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष (जिल्हा कक्ष)** | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **कक्ष/शाखा** | **पदनाम** | **नियुक्ती (शासकीय/प्रति नियुक्ती /कंत्राटी )** | **अधिकारी/ कर्मचारी यांचे नाव** | **मोबाईल** | **प्रदान करण्यात येणारे वेतन** |
| **जल जीवन मिशन कक्ष** | उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता) | शासकीय | श्री.अतुल सुभाष पारसकर | ७७२०८५६१११ | ११७१६१७ |
| | लेखाधिकारी | शासकीय | श्रीम. ज्योती विकास जगताप | ९९८७८२१५९१ | १३९५४२५ |
| | कनिष्ठ प्रशासन अधिकारी | शासकीय | श्रीम. अपुर्वा सुरेश भोये | ९२८४९२६११७ | ९३४०१० |
| | कनिष्ट सहाय्यक | शासकीय | श्री. संतोष टोळू निचिते | ९२७०३४६३५९ | ९५४६२८ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक | कंत्राटी | रिक्त | -- | -- |
| **आस्थापना शाखा** | डेटा एंट्री ऑपरेटर (स्वच्छ भारत मिशन) | कंत्राटी | रिक्त | -- | -- |
| | शिपाई (स्वच्छ भारत मिशन) | कंत्राटी | रिक्त | -- | -- |
| **लेखा शाखा** | लेखाधिकारी (स्वच्छ भारत मिशन ) | कंत्राटी | रिक्त | -- | -- |
| **स्वच्छता कक्ष** | समाज विकास तज्ञ (स्वच्छ भारत मिशन) | कंत्राटी | श्री.दत्तात्रय सोंळके | ९६५३३०३२१७ | ५०३६४ |
| | स्वच्छता तज्ञ (स्वच्छ भारत मिशन) | कंत्राटी | रिक्त | -- | -- |
| | शालेय स्वच्छता व आरोग्य सल्लागार (स्वच्छ भारत मिशन) | कंत्राटी | श्रीम. सारीका रमेश देशमुख | ८६५५५३७३२० | ३१७३८ |
| **माहिती शिक्षण व संवाद कक्ष** | माहिती शिक्षण संवाद तज्ञ (स्वच्छ भारत मिशन ) | कंत्राटी | रिक्त | -- | ० |
| **मनुष्यबळ विकास कक्ष** | क्षमता बांधणी तज्ञ (स्वच्छ भारत मिशन | कंत्राटी | रिक्त | -- | ० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | ) | | | | |
| **संनियंत्रण व मुल्यमापन कक्ष** | संनियंत्रण व मुल्यमापन तज्ञ (स्वच्छ भारत मिशन) | कंत्राटी | श्री. अनिल सुधिर निचीते | ८०९७९१२८८८ | ५०३६४ |
| **लेखा शाखा** | वित्त व संपादणूक सल्लागार (राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम) | कंत्राटी | श्रीम.पल्लवी तडाखे | ८६९२८२०००४ | ४९४२९ |
| **माहिती शिक्षण व संवाद कक्ष** | माहिती शिक्षण व संवाद सल्लागार (राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम) | कंत्राटी | श्रीम. प्रमिला चंद्रकांत सोनवणे | ९३२६१७६०७६ | ४९४२९ |
| **मनुष्यबळ विकास कक्ष** | मनुष्यबळ विकास सल्लागार (राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम) | कंत्राटी | श्री. ज्ञानेश्वर वामन चंदे | ९८३३६८२७४९ | ४९४२९ |
| **संनियंत्रण व मुल्यमापन कक्ष** | संनियंत्रण व मुल्यमापन सल्लागार (राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम) | कंत्राटी | श्री.अतुल वसंत केणे | ९०२९७५०२७५ | ५०३६४ |
| **पाणी गुणवत्ता कक्ष** | पाणी गुणवत्ता सल्लागार (राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम) | कंत्राटी | रिक्त | -- | -- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | जलनिरीक्षक (राष्ट्रीय ग्रामीण पेयजल) | कंत्राटी | रिक्त | -- | -- |

| अ.क्र. | पंचायत समिती उपविभाग | गट समन्वयक | | | समूह समन्वयक | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | नाव | मोबाईल | प्रदान करण्यात येणारे वेतन | नाव | मोबाईल | प्रदान करण्यात येणारे वेतन |
| १ | अंबरनाथ | रिक्त | -- | -- | वैंदेही विक्रम वेखंडे | ९६६५४ ५९४९९ | १४२९० |
| | | | | | रिक्त | -- | ० |
| २ | कल्याण | रीक्त | -- | -- | सुरेखा संजीव कुमार तिम्मन्न पटी | ८६९३० ७४४६६ | १४२९० |
| | | | | | रिक्त | -- | ० |
| | | | | | रिक्त | -- | ० |
| ३ | भिवंडी | रीक्त | -- | -- | रिक्त | -- | ० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | मुकेश ताराचंद वाघ | ९९८७२ ०७९१९ | १४२९० |
| | | | | | रिक्त | -- | ० |
| | | | | | प्रमोद नामदेव वारुंग से | ९२७०२ ७७११२ | १३२१८ |
| ४ | शहापुर | रीक्त | -- | -- | स्विटी स्वामी नाथ बर्वे | ९८६०५ ५६७९६ | १४२९० |
| | | | | | रिक्त | -- | ० |
| | | | | | रिक्त | -- | ० |
| ५ | मुरबाड | राजेश गुलाब वाघे | ८३९० ६१४२ ६७ | १५३६० | रिक्त | -- | ० |
| | | | | | रिक्त | -- | ० |

# विभागामार्फत राबविण्यांत येणाऱ्या विविध योजनांची माहिती

- **वैयक्तिक शौचालय** - मिशन **स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण)टप्पा** -2 अंतर्गत शौचालय सुविधा उपलब्ध नसलेल्या पात्र कुटुंबाना जिल्हास्तरावरून मंजुरी देण्यात येऊन सदर लाभार्थ्यांनी बांधकाम करून वैयक्तीक शौचालयाचा वापर केल्यास प्रति कुटुंब 12000/- प्रोत्साहन पर अनुदान वितरीत करण्यात येते

- कुटूंबाने वैयक्तीक शौचालय बांधकाम पुर्ण करुन वापर सुरु केल्यानंतर ग्रामपंचायत स्तरावरुन ग्रामसेवक खात्री करुन झाल्यावर तालुकास्तरावर गटसमन्वयक, समुहसम्वयक आणि संबधित विस्तार अधिकारी शौचालयांची मागणीनुसार खात्री करतात व गट विकास अधिकारी जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्षाकडे प्रोत्साहनपर अनुदानाची एकत्रित मागणी करतात.
- तालुक्याची मागणी प्राप्त होताच या मागणीतील लाभार्थ्यांची पायाभुत सर्वेक्षणानसुार नमुना चाचणी जिल्हा कक्षास केली जाते. तसेच तालुका संपर्क अधिकारी अधिका-यांकडुनही नमुना तपासणी १०% करण्यात येऊन त्यांना प्रमाणपत्र दिल्यावर मुख्य कार्यकरी अधिकारी यांच्या मान्यतेने तालुक्यास निधी धनादेशाद्वारे वितरीत केला जातो.
- जिल्हयाकडुन निधी प्राप्त होताच संबधित ग्रामपंचायतींच्या मागणीनुसार लाभार्थीनिहाय ग्रामपंचायतींना तालुकास्तरावरुन निधी संबंधित लाभार्थ्यांच्या बँक खात्यात RTGS, NEFT अथवा धनादेशाद्वारे वितरीत केला जातो.
- **सार्वजनिक शौचालय –**
- सार्वजनिक शौचालयाचे बांधकाम हे आठवडी बाजार गर्दी व वर्दळीच्या ठिकाणी, बसस्टॅड , बस थांबा पर्यटन स्थळ तिर्थक्षेत्र या ठिकाणी उभारणे गरजेचे आहे.
-  सदर कामाचे प्रस्ताव उप अभियंता उपविभाग पाणी पुरवठा यांच्याकडून तांत्रिक मान्यता प्राप्त करुन गटविकास अधिकारी पंचयत समिती यांच्यामार्फत प्रशासकीय मान्यता घेऊन जिल्हा कक्षास सादर होणेआपेक्षित आहे.
-  सार्वजनिक शौचालयाला प्रत्येक युनिट मागे ७० % प्रमाणे २.१० लक्ष एवढा निधी स्वच्छ भारत मिशन (ग्रा) आणि ३० % प्रमाणे ०.९० लक्ष असा एकुण ३.०० लक्ष निधी अनुज्ञेय आहे.
- **घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन –**
- जिल्हा हागणदारीमुक्त झाल्यानंतर ग्रामीण भागातील ग्रामपंचायतींमध्ये घनकचरा व सांडपाणी याचे योग्य व्यवस्थापन होणे आवश्यक आहे. या करिता शासनाने स्वच्छ भारत मिशन (ग्रा) अंतर्गत घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनेची कामे शासन परिपत्रक क्रमांक २०२०/प्र क्र ११६/पापु१६ दिनांक २८ ऑक्टोंबर २०२० नुसार प्रमाणीत केलेल्या निकषानुसार कामे करण्यात येणार आहे. यानुसार गावाच्या लोकसंख्येच्या प्रमाणात गुणोत्तर देण्यात आलेले आहे त्यावरुन ७०% स्वच्छ भारत मिशन ग्रामीण व ३०% कृती संगम (१५ वा वित्त आयोग, ग्रामपंचायत स्वनिधी आणि इतर) अश्या प्रकारात अंदाजपत्रकीय रक्कमेची विगतवारी करण्यात आलेली आहे.

**घनकचरा व्यवस्थापन** –

१) ग्रामपंचायत किवा गावस्तरावर साचणा-या कच-या ठिकाणी सार्वजनिक कंपोस्ट खड्डे, गांडूळ खत निर्मिती, वैयक्तिक बायोगॅस प्रकल्प, नाडेप, कच-यावर अंतिम प्रक्रिया करणे अशी कामे करुन कच-याचे योग्य व्यवस्थापन करता येते.

२) प्लास्टिक कचरा व्यवस्थापन सदरचे काम तालुकास्तर किवा जिल्हास्तर एकत्र करुन प्लास्टिक संकलन युनिट (प्लास्टिक पिंजरा जाळी) तयार करुन प्लास्टिक कच-याचे व्यवस्थापन करावयाचे आहे.

३) गोबर्धन प्रकल्प- जैविक व सेंद्रीय कच-याचे जिल्ह्यात एका ठिकाणी उभारण्यात आलेल्या गोबरधन प्रकल्प अंतर्गत त्याचे योग्य व्यवस्थापन करुन त्यापासुन उत्पन्न निर्मिती करणे.

**सांडपाणी व्यवस्थापन**-

१) ग्रामपंचायत किवा गावस्तरावर साचणा-या सांडपाणीचे सार्वजनिक पाझर खड्डा, मॅजिक पीट, गटारी, शोषखड्डा तसेच अत्याधुनिक तंत्रज्ञान वापर करुन सांडपाणीवर योग्य व्यवस्थापन करण्यात येते.

२) मैलागाळ व्यवस्थापन - ग्रामीण भागातील एक खड्डा असलेले व सेप्टिक टँक असलेल्या सर्व शौचालयातील मैलागाळाचे व्यवस्थापन करण्याकरिता जिल्हा आणि तालुकास्तरावर एका निश्चित अंतरात असलेल्या ग्रामपंचायतीचे एकत्रित मैलागाळ व्यवस्थापन प्रकल्प उभारण्यात येणार आहेत.

- **पाणी गुणवत्ता कार्यक्रम**

  राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम अंतर्गत सन 2011 पासून केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचनांनुसार ठाणे जिल्हा परीषदेमार्फत Drinking Water Quality बाबत निरनिराळ्या उपक्रमांची ग्रामस्तरावर अंमलबजावणी करण्यात येत आहे. जिल्हा परीषदेच्या आरोग्य विभागामार्फत करण्यात आलेल्या स्वच्छता सर्वेक्षणाच्या अहवालानुसार जिल्ह्यामध्ये विहीर, कूपनलीका (बॊअर), नळयोजना असे एकूण ३२६१ सार्वजनिक पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत आहेत.

१. **जलसुरक्षक** – जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतींमध्ये पाणी गुणवत्ता कामकाजासाठी तेथील कार्यरत पाणी पुरवठा कर्मचा-यास 'जलसुरक्षक' म्हणून मानधनावर नियुक्त करण्यात आले आहे.
२. **स्वच्छता सर्वेक्षण** – जिल्ह्यातील सर्व ग्रामीण लोकवस्तीच्या ठिकाणी असणा-या सर्व सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांचे आरोग्य कर्मचारी व जलसुरक्षक यांच्याद्वारे पावसाळ्याआधी (एप्रील) व पावसाळ्यानंतर (आक्टोबर) स्वच्छता सर्वेक्षण करण्यात येते. या सर्वेक्षणानुसार स्त्रोतांची तेथील परीस्थितिनुसार तीव्र, मध्यम व अल्प अशा प्रमाणात जोखीम ठरविली जाते. अल्प जोखीम असणा-या स्त्रोतांस हिरवे कार्ड, मध्यम जोखीम असणा-या स्त्रोतांस पिवळे कार्ड तर तीव्र जोखीम असणा-या स्त्रोतांस लाल कार्ड दिले जाते.
३. **निर्जंतुकीकरण / शुद्धीकरण** – T C L (Bleaching) पावडरचा वापर करून सर्व स्त्रोतांचे नियमित शुद्धीकरण केले जाते.
४. **रासायनिक (Chemical) व अणुजेविक (Bacteriological) तपासणी** – ठाणे जिल्हातील पिण्याच्या पाण्याच्या सर्व स्त्रोतांची रासायनिक व अणुजेविक तपासणी केली जाते. रासायनिक तपासणी वाहर्स्तून एकदा व जैविक तपासणी वर्षातून दोनदा केली जाते.
५. **गुणवत्ता बाधीत स्त्रोतांवरील उपाययोजना** – ज्या स्त्रोतांचे पाणी नमुने प्रयोगशाळेतील रासायनिक तपासणी मध्ये दूषित (Quality Affected) असल्याचे आढळून आले आहे. जे स्त्रोत अणुजेविक तपासणीमध्ये बाधीत असल्याचे अहवाल प्रयोगशाळेद्वारे प्राप्त होतात त्या स्त्रोतांचे तात्काळ Super Chlorination करण्यात येते व तेथील नमुन्यांची पुनर्तपासणी करण्यात येते. तसेच लाल कार्ड मिळालेल्या ग्रामपंचायतमधील जोखीमग्रस्त स्त्रोतांबाबत 1 महिन्याच्या आत प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात येतात.

पाणी गुणवत्ता सनियंत्रण व सर्वेक्षण कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे निरनिराळ्या जलजन्य साथरोगाचा उद्रेक कमी होऊन ग्रामस्थांचे आरोग्य स्वस्थ राहण्यास निश्चितच मदत होते.